**प्रभु तरुण आश्रयदाते**

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तीकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य



तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

□□□.□□□□□□□□□□□.□□□

: संपादिका :

सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :

मिनाक्षी जयकर
मयुरा नायक
संजना कोठारे
वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया



**प्रभु तरुण आश्रयदाते**

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक



**वर्ष ८५ वे)** **प्रभुतरुण मुंबई, रविवार, ता. १६ माहे मे, सन २०१०** **(अंक ९७०**


*संपादकीय*

## स्मरणात खरोखर....

-सुहासिनी कीर्तिकर

गेल्या अकरा तारखेला प्रा. कुसुम बेनीलाल गेल्या. या कोण? तर माझे व्याही श्री. सुभाष र. देसाई यांच्या मावशी. पूर्वाश्रमीच्या कुसुम रामराव प्रधान. माझ्या मुलीच्या लग्नात त्यांची खरी ओळख झाली. खूप वेल्हाळ. अगत्य असलेल्या. शरीराने वय झाले असले तरी मनाने वयातीत. नंतर डॉ. नीला वेलकरांकडे गणपतीत, मुलीच्या सासरी प्रसंगाप्रसंगाने भेटत राहिल्या. गप्पागोष्टीत रमणं, माणसं जोडणं, परोपकाराचा- समाजसेवेचा वसा उचलणं आणि मुंबईपर्यंत एकट्या असूनही एकटेपणाला वाळीत टाकणं हा त्यांचा जगण्याचा मंत्रच होता. वयाची नव्वदी पार केलेल्या या मावशी पुण्याहून एकट्या प्रवास अगदी आताआतापर्यंत करत होत्या. त्या आदर्श जीवन जगल्या. त्यांच्या ‘स्मरणात खरोखर’ आपण जगावं. त्यांना माझे अभिवादन. कोकणातील दाभोळचे समाज-कार्यकर्ते, कोमसापच्या प्रादेशिक संमेलनाचे नुकतेच अध्यक्ष राहिलेल्या श्री. अण्णा शिरगावकरांनी आपल्या ‘प्रकाशदीप’ पुस्तकात त्यांच्याविषयी जे लिहीले आहे; तेच इथे मी पुनर्मुद्रित करते.

श्रीमती कुसूम बेनीलाल म्हणजे आमच्या मुंबईच्या अचला देसाईंच्या सासूबाई, शैलाताई साठेंच्या स्नेही. त्यांचे सूचनेवरूनच एकदा पुण्याला श्री. वसंत मनोहरांबरोबर त्यांच्या ब्लॉकवर गेलो. दार उघडेच होते. समोर भिंतीवर एका रूबाबदार देखण्या तरुणीचा पदवीदान समारंभातील मोठा फोटो नजर वेधून घेत होता.

२/३ मिनिटांतच आतल्या खोलीतून एक वृद्ध बाई बाहेर आल्या. वृद्ध कसल्या? प्रचंड उत्साहाने आणि हसत त्यांनी आमचे स्वागत केले. खणखणीत आवाज आणि नॉनस्टॉप भराभर बोलणे हे त्यांचे दर्शन माझे कायम लक्षात राहील. त्यांनी चहा, बिस्किटे आणली. मी सहजच भिंतीवरील एका फोटोकडे अंगुली निर्देश करीत म्हणालो, ‘या कोण? कन्या, सून?’ त्या म्हणाल्या, ‘छे हो! ती मीच आहे! १९३९ सालात पदवी घेतली तेव्हाची.’ वयाच्या तिसऱ्या वर्षीच आई गेली. वडिलांनीच त्यांचा प्रतिपाळ केला. मराठी शाळेपासूनच त्यांनी शिक्षणात पहिला नंबर मिळवायला सुरूवात केली. सेंट झेवियरमधून बी. ए. झाल्यानंतर पार्ले टिळकमध्ये व एका कॉन्व्हेंटमध्ये नोकरी केली. १९४४ मध्ये बी. टी., स्टॅटिस्टिक शिकण्यासाठी पुण्यात गोखले इन्स्टिट्यूटमधून डिप्लोमा, रिसर्च असिस्टंट म्हणून नोकरी अशा या ज्ञानव्रती विदुषीचा १९५६ मध्ये प्रो. बेनीलाल यांच्याशी विवाह झाला. त्यांचे शिक्षण चालू होते. तेव्हा देशात स्वातंत्र्याचे वारे वाहत होते. वनिता मंडळातून सामाजिक काम, नाटकात भूमिका त्यांनी केल्या. कॉंग्रेस हॉलमध्ये कै. कस्तुरबा गांधी यांच्यासाठी केलेल्या नाटकात त्यांची भूमिका होती. कस्तुरबांकडून त्यांना खादीची साडी भेट मिळाली होती. १९६२ मध्ये चायना वॉर फंड घरोघरी जाऊन गोळा केला. जवानांसाठी स्वेटर, कॅप्स विणून पाठवल्या. नाट्यप्रयोग करून दाखविले. उमेदीच्या काळात मुंबईला अशाप्रकारे कष्टाने व नोकऱ्या करून शिक्षण व सेवाकार्य करून १९६३ मध्ये पती निवृत्त झाल्यावर उभयतांनी बनारसला


(पान २, कॉलम १ वर)


*विस्तारीत संपादकीय*

## ‘तुझ्यापायी....’

- मिनाक्षी जयकर

‘मे डे! मे डे!’ ओह सॉरी! घाबरलात का? चुकून मी May Day म्हणाले. मला म्हणायचं होतं. ‘महाराष्ट्र डे! महाराष्ट्र डे!’ यंदाच्या एक मे रोजी आपल्या महाराष्ट्राने आपला सुवर्ण महोत्सव साजरा केला. महाराष्ट्र राज्य स्थापन होऊन पन्नास वर्ष झाली. 50 glorious years! आमची पिढी जन्माला येईपर्यंत भारताला स्वातंत्र्य मिळणं ही गोष्ट तशी जुनी झाली होती. पण संयुक्त महाराष्ट्रचळवळ, मुंबईसह महाराष्ट्र राज्य स्थापनेसाठी मराठी जनतेने दिलेला लढा, हा इतिहास ताजा होता. त्यातून मी पार्ले टिळक विद्यालयाची विद्यार्थिनी, टिळकांची परंपरा चालवणारे शिक्षक मला लाभले. पाठ्यपुस्तकाद्वारे भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास आम्ही शिकत होतो. पण संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचा इतिहास आमच्या शिक्षकांच्या मुखातून आम्हा विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबत होता. आचार्य अत्रे, एस. एम. जोशी, कॉम्रेड डांगे अशा अनेकांचे प्रयत्न ऐकताना अंगात वेगळेच चैतन्य दौडू लागे. कॉम्रेड अहिल्याबाई रांगणेकर, कॉम्रेड तारा रेड्डी, मृणाल गोरे वगैरे वीरांगनाही यात मागे नव्हत्या; हे ऐकताना ऊर अभिमानाने भरून येत असे.

हें राज्य स्थापन होताना द्यावा लागलेला लढा सोपा नव्हता. त्याचे परिणाम वेगळे होते. भारताचा स्वातंत्र्य लढा हा परकीय सत्तेविरुद्ध होता. पण संयुक्त महाराष्ट्राचा लढा हा स्वकीयांविरुद्ध लढावा लागला. स्वकीयांनी स्वकीयांवर गोळीबार करून १०५ हुतात्म्यांचे रक्त सांडले. स्वातंत्र्योत्तर काळात भाषावर प्रांतरचना करताना सर्व राज्ये एक भाषिक होती. फक्त एकच राज्य द्विभाषिक होते-मराठी आणि गुजराथी भाषिक प्रांत एकत्र करून बनवलेले मुंबई राज्य. इतर भाषिकांना त्यांच्या मायबोलीची राज्ये मंजूर होत असताना मराठी भाषिकाला मात्र त्याच्या हक्काच्या राज्यापासून वंचित ठेवण्यात आले हे मराठी माणसाच्या जिव्हारी लागले. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाली त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक मराठी जनता या चळवळीत सहभागी झाली. (आपल्या जातीतीलही अंबिका धुरंधर, कॉम्रेड जयवंत कोठारे, कॉम्रेड कुसुम कोठारे, नारायण अजिंक्य, सुंदर नवलकर इ. कितीतरीजण या लढ्यात सक्रीय होते.) मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा लढा हा लोकांचा लढा होता. त्याकरता प्रत्यक्ष परमेश्वराशी भांडण्याचा प्रसंग आला तर त्यासाठीही ही मराठी जनता तयार होती. आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, सेनापती बापट, सी. डी. देशमुख यांचा जनमानस तयार करण्यात सिंहाचा वाटा होता. ह्या जगन्नाथाच्या रथाला अनेकांचे हात लागले आणि अखेरीस १ मे १९६० रोजी मुंबईसह मराठी राज्य अस्तित्वात आले.

आज १ मे २०१० रोजी या प्रसंगाला पन्नास वर्ष पूर्ण होत आहेत. या पन्नास वर्षात या महाराष्ट्राने अनेक चढउतार पाहिले. आज या घडीला ते भारतातील एक प्रगतीशील राज्य आहे. राज्याचा पन्नासावा वर्धापनदिन सर्वत्र धुमधडाक्यात साजरा केला गेला. निरनिराळे कार्यक्रम, आतषबाजी,


(पान २, कॉलम ३ वर)

(पान २, कॉलम २ वरून)

जावयाचे ठरवले. तेथे गंगाकिनारी एक छोटा बंगला बांधून चिंतन, मनन, जमेल ती सेवा, कार्य करीत जवळपास १० वर्षे मोठ्या आनंदात समाधानात त्या राहिल्या. दुर्दैवाने १९७३ मध्ये त्यांच्या संसारजीवनातून आणि इहलोकातून प्रो. बेनीलालनी निरोप घेतला. त्या एकट्या झाल्या आणि मित्र नातेवाईकांच्या सल्ल्याने बंगला, गाडी वगैरे सर्व विकून त्यांनी पुण्यात येण्याचा निर्णय घेतला.

आता गेली ३५ वर्षे त्या पुण्यात एकट्या राहत आहेत. पण एकाकी नाहीत. त्या म्हणतात, 'मी समृद्ध जीवन जगत आहे.' गेलेल्याचा शोक करण्यापेक्षा आलेला क्षण आनंदात कसा घालवायचा याचा बोध त्यांना अध्यात्माच्या चिंतनामुळे लागला. त्यांच्या शेजारच्या हरेकृष्ण मंदिरात त्या रोज जातात. आध्यात्मिक प्रवचनांना जातात. त्यातच त्यांच्या मूळ आवडीतून त्यांनी पेंटींगची कला शिकून घेतली. शिक्षणासाठी गोरगरीब मुले शोधून त्यांना वैयक्तिक मदत व काही संस्थांना मदत करण्याचे काम चालूच असते. गरजू गरीब कुटुंबांना त्यांच्या संकटप्रसंगी मदत करण्यासाठीही त्यांनी ४/५ लाख रुपये खर्च केले आहेत. आपल्या भोवतालची माणसे व कुटुंबे आनंदी राहिली पाहिजेत. आपण जेवढा आनंद दुसऱ्याला देऊ तेवढा आनंद देव आपल्याला देतो असा त्यांचा सोपा अध्यात्म्याचा विचार आहे. त्यांचे मित्र, नातेवाईक त्यांना शोधीत येतात. त्यांच्याकडे वाढदिवस, बारशी यासाठी त्या नाताळबाबासारख्या भेटी घेऊन जातात. या आजी सर्वांना हव्या असतात.

त्यांचे एक शेजारी वाणी आडनावाचे. यांच्याशी त्यांचे. अगदी घरोब्याचे संबंध. वाणींचा नातू या आजींना बेनी आजी म्हणतो. मलाही ते नाव आवडते. अशा या बेनी आजी दोन वर्षांपूर्वी दाभोळला संस्था पाहण्यासाठी आल्या होत्या. आमच्या संस्थेच्या मुख्य इमारतीमध्ये जायचे म्हणजे २ वेळा पायठण्या चढाव्या लागतात. पण त्यांनी हात धरू दिला नाही. वयामुळे आता जिने चढायला होत नाही. पण त्या दोन्ही हात टेकीत भराभर वर चढून गेल्या आणि त्यांनी लगेच सांगितले, 'या पायठाण्यांचे बाजूला पाईल रेलींग्ज करून मला खर्च कळवा म्हणजे पुढच्या वेळी मला कुणाची मदत नको.' त्या पंचनदीच्या मुलींच्या वसतीगृहात दिवसभर रमल्या होत्या. त्यांच्या सहवासात मुलींना शाळेत जायलाही सुचत नव्हते. जाताना त्या म्हणाल्या, 'पुढच्या वेळी येईन तेव्हा मी वसतीगृहातच राहीन. तुमची गेस्टरूम नको.' हा सर्व त्यांच्या जीवनाचा, त्यांच्या कर्तृत्वसंपन्न बुद्धिमत्तेचा आलेख झाला. पण त्यातील विशेषता अशी की, आम्ही ग्रामीण मंडळी ज्याला 'खारकेसारखी म्हणतो तशी त्यांची नव्वदाव्या वर्षीही तब्बेत आहे आणि आवाजही ९० वर्षांपूर्वीच्या चांदीच्या रुपयासारखाच खणखणीत आहे. बोलणे म्हणजे नायगाराच्या धबधब्यासारखे आहे. मराठी बरोबर हिंदी, इंग्रजी सुभाषिते, कोटेशन्स त्यांना पाठ आहेत. गतायुष्यातील दु:ख-कष्टाचा उल्लेख त्यांच्या बोलण्यात नाही. कुणाच्यावर टीका, रोष नाही. या वयात शारीरिक दुर्बलता, काही दुखणी असणारच. पण त्याबद्दल बोलताना मी कधी ऐकले नाही. प्रचंड उत्साह, विनोद-कोट्या करण्याची हौस, कुणाला काय देऊ नि काय नको अशी त्यांना घाई लागलेली. माणसाने जगावे कशासाठी? जगावे कसे? आणि आपले सुख सर्वांना वाटून कसे घ्यावे, याचा वस्तुपाठ म्हणजे कुसुमताई बेनीलाल. पन्नास-पंचावन्नाव्या वर्षी म्हातारे झालेल्यांनी, आयुष्यभर रडगाणे गाणारांनी, गाड्या, बंगले आणि प्रॉपर्टी असूनही दु:खात असणारांनी या व अशा खळाळल्या, 'शरीर वृद्धा:मनोयुवा' व्यक्तींच्या जीवनाकडे आदर्श म्हणून पाहावे अशा या बेनी आजी. या प्रकाशदीपाला, माझे त्रिवार वंदन!

(पान २, कॉलम ४ वरून)

लेझर शो- कशाचीही कमतरता ठेवली गेली नाही. पण तेवढ्यावरच थांबून चालणार नाही. हा सुवर्णमहोत्सव हा शुद्ध सोन्यासारखा असली झळाळीचा आहे, १ ग्रॅम सोन्याच्या दागिन्यांप्रमाणे दिखाऊ नाही हे सिद्ध करण्याचं उत्तरदायित्व आताच्या आणि यानंतर येणाऱ्या पिढ्यांचं आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र जरी झाला तरी हा लढा इथेच संपता कामा नये. बेळगाव, निपाणी, कारवारसारखे मराठी भाषिक प्रांत अजूनही परराज्यात आहेत. त्यांच्या एकत्रीकरणाचे प्रयत्न व्हायला हवेत. त्याचबरोबर विदर्भ, मराठवाडा यासारखे सध्या महाराष्ट्रात असलेले प्रदेश विभक्त होणार नाहीत याचीही काळजी घेतली पाहिजे. महाराष्ट्र हे एक कल्याणकारी राज्य बनवण्याचा प्रयत्न व्हावा जेणे करून शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांना आळा बसेल, महाराष्ट्र ही शेतकऱ्यांची स्मशानभूमी झाल्याचा जो आरोप केला जातो तो काहीसा धुवून निघेल. पाठ्यपुस्तकांच्या सुरुवातीला भारताची प्रतिज्ञा प्रसिद्ध केलेली असते- 'भारत माझा देश आहे...' वगैरे वगैरे.त्याच धर्तीवर संयुक्त महाराष्ट्रासाठीही आपण प्रतिज्ञा घेऊया आणि आचार्य अत्र्यांचं हे महाराष्ट्र गीत म्हणूया,

*'महाराष्ट्र! तुझ्यापायी असो*
*गाष्टांग वंदन*
*तुझ्यासाठी झिजो माझ्या देहाचे*
*नित्य चंदन*
*महाराष्ट्र! तुझ्यापायी घालू*
*लोटांगणे किती?*
*तुझी गाणी, तुझी स्तोत्रे भक्तीने*
*गाऊ मी किती?'*

## Prabhu Tarun

**- Achala Desai**

While away from Motherland--- celebrating 'Mother's Day' in Auckland,New Zealand.The big day was scheduled for 9th of May but the preparations started way ahead. Big posters, great discounts, beautiful gift hampers and much more was displyed all over. The whole of the city and the suburbs wore a festive look as though there was a big festival round the corner!!

The local newspapers had a story of a Kiwi familywho lost their mother six months back,but all the same, were fully geared up to celebrate Mothers's Dayin her Memory! This lady had a brood of eleven children who in turn had their own young ones and ofcourse they had their offsprings by now.This huge family, now scattered all over,were to meetover breakfast on the 9th of may to celebrate Mothers Day in memory of their late mother-grandmother-greatgrand mother.A wonderful tribute to the departed soul who must have really toilled to put such a huge family in place! Sometimes I wonder why we celebrate just one day in the whole calendar as Mother;'s Day? isn't everyday Her Day?We say that the world we live in belongs to Mother Earth or Dharti Mata.We say that the country where we are born is our motherland or Bharatmata.It is because of this Dharti and her abundant nature that mankind has survived; it is at her mercy that we thrive.Just a shiver of an earthquake or a vomit of a volcano or a bout of dehydration can leave this mother's brood of mankind lost to adverse conditions.on the other hand, in her youthful and progrssive endevours,this Mother Earth and Mother Nature have brought up the whole of mankind as one big family.Don't we owe any obeisance to this Mother who has given us so much?Ofcourse we do! Lets get to work then!! I feel, every day of the calendar is Mother's Day. Every mother or a mother figure is the pivot of the family.The essence of life rotates around her,she is the caretaker of the whole family in more than a hundred ways.She is there for you physically, mentally and emotionally. She is the Mother we perceive after the abstract figure of Mother Earth.A mother is adressed differently as Aai, Maa, Baa, Amma, Avaa, Mummy, Mom etc. but the feeling in that adress is universal.It is one person with the same character-- that of love,caring and patient bearing.A mother always walks along with her children in life and death--this cannot be explained but one has to experience it. The least we can do, is give due respect to MOTHER and hurt her in the least possible way.Let us remember that it is because of Mother that we are here today and are able to enjoy the wonderful creation of the Almighty.Let us pray that every Mother gets the strength and courage to bring up good human beings in order to make the world a better place to live in and thereby relieve Mother Earth of this burden. From one Mother to all the Mother Figures-----Wish You Happy Mother's Day---today and everyday!

## अनुभवामृत

**-सौ. अनघा(योगिता) केदार गोरक्षकर**

व्यक्त करण्यास आनंद व दु:ख पण वाटते पण आपण 'पाठारे प्रभु' मुंबईच्या आद्या नागरीकांपैकी एक. आपली राहणी, हुशारी, श्रीमंती व खाद्य संस्कृती आणि इतर गुणांमुळे आपली ज्ञाती उच्चभ्रू म्हणून फारच थोड्या लोकांना माहीत आहे. नाहीतर पाठेर प्रभु म्हणजे कोण? असा प्रश्न लोकांना का पडतो. याच आपल्या चवीष्ट खाद्य संस्कृतीला मानाचं स्थान मिळवून देण्याकरीता मी स्वत: मनेसेने आयोजित केलेल्या खाद्य महोत्सवात भाग घेतला होता.

या महोत्सवाकरता मी काजू पोळी, तेलपोळी, खजूर पोळी, मथलेले बेसून लाडू, पंगोजी (व्हेज, नॉनव्हेज), कोलंबीचं खडखडलं, (खदखदलं नव्हे). (म. टा. २ मे रंगीत पुरवणी(शेवटचे पान.) तिसऱ्यांचा रस्सा, कोबीचं कोलंबी घातलेलं भानवलं, कोलंबीचं लोणचं, तसेच व्हेज घडा सादर केला होता. माझ्याच बाजूला आपल्या सर्वांना परिचित असलेला निखिल कॅटरर्सचा स्टॉल होता. त्यांना माझं कोलबीचं खडखडलं खूपच आवडलं. तसेच विजू खोटे, भारती आचरेकर, वंदना गुप्ते, मिलींद इंगळे यांना पंगोजी फारच आवडली. ऑर्कीड या फाईव्ह स्टार हॉटेलचे मालक व संस्थापक श्री. विठ्ठल कामत यांनी खास गिफ्त देऊन कौतुक केले.

दु:ख एवढेच वाटते की, एवढे चवीष्ट पदार्थ आपल्या ज्ञातीत असून ते इतरांना माहीतच नाहीत. मुळात लोकांना पाठारे प्रभु ज्ञात ज्ञातच नाही. २ मेच्या म. टा. मध्ये तर पंगोजीला करंदीजी भजी, कोलंबीचे खदखदले म्हणून सी.के.पी. पद्धतीत छापून आलंय. पाठारे प्रभु पद्धतीचा उल्लेखच नाही.

म्हणून आपल्या पदार्थांना खावय्यांमध्ये मानाचे स्थान व पहिली पसंती मिळवून देण्याचा चंगच मी बांधलेला आहे. या कामात मला माझ्या ममाची खूपच साथ मिळाली. तसेच आईंचा हात फ्रॅक्चर असून देखील मी बोरीवलीला राहून हे सर्व करू शकले ते केवळ माझ्या सासरच्या समंजसपणामुळे शक्य झाले. तरी सर्व ज्ञाती बांधवांनी या उपक्रमा करता मला आशीर्वाद व प्रोत्साहन द्यावे ही अपेक्षा.

दूरध्वनी-२०३२०१०४/९८१९१७६९९९

किस्से कोर्टातले-

# ताबा कुणाचा ?

-सौ. बागेश्री योगेन परीख

फॅमिली कोर्टात प्रविष्ट होणाऱ्या वैवाहिक दाव्यामध्ये जेव्हा वैवाहिक आयुष्य संपुष्टात येत असतं, तेव्हा मुलांचा ताबा कुणाकडे द्यावा; ह्याबद्दलचे litigation फारच संवेदनाशील असतं, आणि कोर्टामध्ये ते अतिशय काळजीपूर्वक हाताळावं लागतं. चाईल्ड कस्टडीच्या संबंधित कायदे केलेले असूनही ऑर्डरमध्ये फायन्यालिटी कधीच येत नसते. परिस्थितीनुसार हे निकाल बदलत रहावे लागतात.

प्रत्येक दाव्यामध्ये Paramount consideration is welfare of the child म्हणजेच आईवडिलांच्या हक्कापेक्षा मुलाचं कल्याण हाच सर्वश्रेष्ठ निकष ठरावा असाच निकाल द्यावा लागतो.

मुलांचा ताबा ठरविताना त्यांचं वय, लिंग, आईवडीलांच्या इच्छेची सत्यता, मुलाची कुणाकडे रहावयाची इच्छा, आईवडीलांचे चारित्र्य, त्यांचे मानसिक विकार, मुलांना पोसण्याची व घडविण्याची कुवत, मुलांची शारीरिक, मानसिक व शैक्षणिक गरज; ह्या सर्व गोष्टींचा कटाक्षाने विचार करावा लागतो. मी समुपदेशक असताना हाताळलेली केस इथे नमूद करावीशी वाटते. त्याआधी वाचकांच्या माहितीसाठी थोडी पार्श्वभूमी सांगते.

पारसी किंवा झोरास्ट्रीयन धर्मीय सोडून इतर सर्व धर्मांच्या व्यक्तींसाठी विवाहविषयक खटले, कुटुंब न्यायालयात दाखल करावे लागतात. पण पारसी धर्मीयांसाठी विवाह-विषयक खटले मुंबईच्या हायकोर्टातच करावे लागतात (ज्यांचं लग्न झोरास्ट्रीयन धर्मसूत्राप्रमाणे झालं असेल तरच) त्यांच्या न्यायदानात न्यायमूर्तींबरोबर पाच ते सात ज्यूरींचा सहभाग असतो. हे ज्यूरी पारसी पंचायतनी नेमून दिलेले असतात व ते झोरास्ट्रीयन धर्माचे असतात.

श्री व सौ. दारुवाला (नावे बदललेली आहेत) हे पारशी जोडपं एक वर्ष एकमेकांपासून वेगळे राहत होतं व त्यांची घटस्फोटाची केस मुंबई हायकोर्टात चालू होती. त्यांचा ७ वर्षाचा मुलगा परवेझ, कधी आईकडे तर कधी वडीलांकडे राहत होता. श्री. व सौ. दारुवाला दोघेही उच्चशिक्षित होते. दारुवालांचा बिझनेस होता; तर शिरीन बँकेमध्ये ऑफिसर होती.

दारुवालांच्या घरी त्यांची लग्न न झालेली बहीण व वयस्कर वडील होते. शिरीनचं दारुवालांशी व त्यांच्या घरच्यांशी कधीच पटलं नव्हतं. दोघंही वयाने ४५च्या आसपास असावीत. लग्न उशीरा, त्यामुळे मुलगा पण उशीरा झाला. शिरीनला परवेझवर दारुवाला कुटुंबाचे संस्कार होऊ द्यायचे नव्हते. रोजच घरात भांडणतंटे व्हायचे. शेवटी शिरीननी भायखळ्याचं सासरचं घर सोडलं व ती ताडदेवला पारसी कॉलनीत राहायला आली. तिला घटस्फोट नको होता. पण परवेझचा ताबा पूर्णतया हवा होता. त्याच्यावर दारुवाला कुटुंबियांची सावलीसुद्धा पडू नये अशी तिची इच्छा होती.

सोली दारुवालांनी घटस्फोटाची केस दाखल केल्या केल्याच परवेझचा ताबा मागीतला. कोर्टाने परवेझने. शनिवारी व रविवारी वडीलांकडे रहावं व इतर वेळी फ्री असेस दिला होता. त्यामुळे परवेझ कधी वडीलांकडे तर कधी आईकडे रहात होता. त्याचा कायमस्वरूपी ताबा ठरवणं खरंच कठीण होतं. कारण आईवडील दोघेही परवेझला सांभाळण्यास कॅपेबल होते. कुठेच उणीव दिसत नव्हती. परवेझला बरेचदा कोर्टात यावं लागायचं. न्यायमूर्तींनी त्याला तुला कुणाकडे रहावयाचं आहे; असं विचारल्यानंतर तो खूप गोंधळायचा. आईबरोबर जेव्हा येत असे तेव्हा म्हणायचा, 'मला आईकडे राहायचं आणि वडिलांबरोबर यायचा तेव्हा म्हणायचा, 'मला वडीलांकडे राहायचं आहे.' पण का राहायचं आहे किंवा एका पालकाकडे का रहावयाचं नाही हे तो सांगू शकत नव्हता.

न्यायमूर्तींना, परवेझचं गोंधळलेले मन जाणून घ्यायचं होतं. मी तेव्हा समुपदेशक होते. मला न्यायमूर्तींनी confidence मध्ये घेऊन सांगीतलं की तुला परवेझच्या शाळेत जाऊन त्याची मुलाखत घ्यावी लागेल. त्यावेळी त्याचे आईवडील कोर्टात असतील त्यामुळे कुणीही परवेझवर प्रेशर आणू शकणार नाहीत.

माझ्या हातात ऑर्डरची कॉपी पडल्याक्षणीच मला परवेझच्या शाळेत धाव घ्यावी लागली. शाळेच्या मुख्याध्यापकांनी खूप सहकार्य केलं. कारण ऑर्डरच तशी होती. एका छोट्याशा केबीनमध्ये परवेझला बोलावलं गेलं व आमच्या दोघांशिवाय तिसरं कुणीही तिथे नसेल अशी खात्री करण्यात आली.

परवेझ ७ वर्षाचं पोर होतं. गोरापान, पण थोडासा ओंगळ, पॅंट घसरलेली, केस विस्कटलेले. पण डोळे खूप बोलके. थोड्याच वेळात परवेझ खूप फ्रेंडली झाला. जणू त्याला कुणाशी तरी खूप बोलायचं होतं. मन मोकळं करायचं होतं.

आम्ही खूप बोललो. त्याला कुणाकडे राहायचं आहे हा प्रश्न मी त्याला विचारला नाही. तो म्हणाला, 'मला मम्मी आवडते. पण ती खूप, झगडा करते. मला खूप खायला लावते. मला एकसारखं सांगते की सोली आणि त्याची बहीण वाईट आहेत. तू त्यांच्याकडे जाऊ नकोस. गेलास तर रड, त्याला मार.' हे सगळं सांगेपर्यंत परवेझ खूप मोकळा झाला होता. आता तो मला एक सिक्रेट सांगणार होता.

तो म्हणाला, 'मम्मी मला एका गॉडमॅनकडे घेऊन जाते. तिथे खूप धुमाडा असतो. तो गॉडमन, मोराना पीछा माझ्यावरून फिरवतो व सांगतो, 'बोल, मने मारा मम्मीपासे रेहवु छे. पपा गंदा छे.' मला त्या गॉडमनची खूप भीती वाटते. तो माझ्या ड्रीममध्ये येतो. एकवार तो हुं धोलीयापरथी पडी गयो! हुं रडु छु पण मम्मी मानती नथी.'

परवेझची मुलाखत एक तास चालली. त्याने असे बरेच प्रसंग मला सांगितले. ॲक्टिंग करून दाखवली. वडीलांबद्दल विचारल्यावर मात्र परवेझ खुशीत आला. मला माझ्या पप्पासारखा बिझनेस करायचा आहे. मने ग्रॅंडपा बहुज गमे छे. मारी आंटी मने भणावेछे.' वडिलांच्या घराविषयी तो भरभरून बोलत होता. त्याच्या अगदी लहानपणीच्या आठवणी त्या घराशी निगडीत होत्या.

परवेझची मुलाखत संपविताना उगाच कुठेतरी मन हेलावल्याची भावना निर्माण झाली. मी सांगितलेलं तुम्ही कुणाला सांगू नका असं सांगायला पण परवेझ विसरला नाही. आणि खोटं आश्वासन देऊनच मला त्याचा निरोप घ्यावा लागला.

परवेझच्या वर्गशिक्षकांशी बोलताना कळलं की परवेझचं अभ्यासात बिलकूल लक्ष नसायचं. तो एकतर वेंधळ्यासारखा वर्गात बसून राहायचा किंवा इतर मुलांबरोबर मारामारी करायचा. शिक्षकांना त्याच्या प्रॉब्लेमची थोडीफार कल्पना होती. त्यामुळे त्या परवेझला सांभाळून घ्यायच्या. त्यांच्याकडून कळलं की, परवेझ ७ वर्षाचा असूनही साधी ए बी सी डी त्याला लिहिता येत नव्हती.

दुसऱ्याच दिवशी मी परवेझच्या केसचा रिपोर्ट लिहावयास घेतला. परवेझचं बोलणं अगदी Verbatum लिहून काढलं. माझं इंप्रेशनसुद्धा लिहिलं नाही. माझा रिपोर्ट कोर्टात पोचेपर्यंत गुप्त होता. पण त्यानंतर तो ओपन केला गेला.

केसमध्ये काय होतं हे जाणून घ्यायला मीसुद्धा उत्सुक होते. न्यायमूर्तींनी खूप सुरेख निकष लावून अखेर परवेझला त्याच्या वडीलांकडे सोपवलं होतं व वीकएन्डस् आईला दिले होते.

त्यानंतर मात्र मी माझ्या कामात व्यस्त राहिले आणि परवेझला विसरले. पण साधारण तीन महिन्यांनी माझ्या नावावर एक ग्रिटींग कार्ड आलं. उघडून पाहिलं. तर त्यात लिहिलं होतं,

Dear Aunty,

Thank you, very, very, very very much.


yours Pervez

खरंच आश्चर्याचा धक्का होता. तीन महिन्यांपूर्वी ए बी सी डी पण लिहिता न येणाऱ्या परवेझनी वडीलांकडे गेल्यावर खूपच प्रगती केली होती. अक्षर मोडक तोडकं होतं पण त्या मागची भावना खूप काही सांगून गेली होती.

❑

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



YUVA ANCH

Together Towards Tomorrow

शिदोरी

# प्रत्यक्ष परमेश्वरसुद्धा कधी कधी हतबल!

-उज्ज्वला गोविंदराव भगवंतराव आगासकर

नाशिक शहरामध्ये राहण्याचे ठरविले. येथेच आर्किटेक्ट म्हणून प्रॅक्टिस करण्याचे ठरविले. तेव्हा लक्षात आले की इथली पद्धत अशी आहे की जमिनीचे मालक ज्या समाजाचे असतील त्याच समाजाचे आर्किटेक्ट शोधले जायचे. म्हणजे गुजराथ्यांना गुजराथी, ब्राह्मणांना ब्राह्मण, मराठ्यांना मराठे वगैरे. अशा परिस्थितीत एका परभिणीला काय स्कोप होता? त्यामुळे एखादे चांगले मोठे प्रॉजेक्ट आले की मला फार आनंद होत असे.

असेच एकदा एक प्रॉजेक्ट आले. पेशव्यांच्या काळात बांधलेला सरदारांचा जुना वाडा पाडून तेथे नवी बिल्डिंग बांधायची होती. मात्र मालक म्हणून कागदोपत्री अनेक व्यक्तींची नावे नोंदलेली होती आणि त्या सर्व व्यक्ती हैदराबादला राहत होत्या. नव्या बिल्डिंगचे प्लॅन्स मंजुरीसाठी कॉर्पोरेशनकडे पाठवायचे तर कागदपत्रांवर आणि प्लॅन्सवर त्या सर्वांच्या सह्या घेणे आवश्यक होते. कागदपत्र मी तयार केले. मात्र त्या सर्वांनी सह्यांसाठी नाशिकला येण्याऐवजी असे सुचवले की हैदराबादला जाऊन मी सर्व सह्या घ्याव्या. माझ्याबरोबर माझे वडील आले. हैदराबादचे सह्यांचे काम आटोपल्यावर वडिलांबरोबर फिरून तिथली प्रेक्षणीय आणि ऐतिहासिक स्थळे आम्ही पाहिली. चार मिनार-सारख्या तिथल्या वास्तूंचा 'भारतीय वास्तुशास्त्राचा इतिहास' या विषयात पुस्तकी अभ्यास केलेला असल्यामुळे तेथे जाऊन प्रत्यक्ष पहाणे ही फार आनंददायी घटना होती. त्यातच एक संपूर्ण दिवस फिरण्यासाठी आम्ही स्पेशल बसने निघालो आणि ती बस सकाळीच आम्हाला गोवळ-कोंड्याच्या किल्ल्याच्या पायथ्याशी घेऊन आली. तेथे उतरून सारा परिसर एका गाईडबरोबर पायी फिरून पहायचा होता. तिथले त्या काळातले दगडी भक्कम बांधकाम आणि बांधकामामधल्या आश्चर्यकारक युक्त्या पाहून सारेच प्रवासी अचंबित होत होते. विशेषतः मुख्य प्रवेश-द्वाराच्या कमानीत गडाच्या तळाशी वाजविलेली टाळी शेकडो फूट उंचीवर आणि कितीतरी दूर असलेल्या दरबार हॉलमध्ये ऐकू जाते, आणि तिथून टाळीने दिलेले उत्तर पुन्हा प्रवेशद्वारात ऐकू येते याचे प्रात्यक्षिक पाहून सारेच प्रवासी हतबुद्ध आणि हैराण झाले होते.

आम्हाला ती सर्व माहिती देणारा आणि आमच्याबरोबर फिरणारा जो गाईड होता तो धर्माने ख्रिश्चन होता हे त्यानेच आम्हाला सांगितले. इतिहासाचा विद्यार्थी असल्यामुळे तेथल्या राजवटी, प्रमुख घटना, व्यक्ती, भरभराट आणि वाताहात यांचीदेखील वास्तूंच्या बरोबरीने त्याला माहिती होती. आमचा सगळा चाळीस जणांचा ग्रूप तो सांगत असलेल्या गोष्टी ऐकत, प्रश्न विचारत त्याच्यामागोमाग एकत्रच फिरत होता.

प्रवेशद्वाराच्या कमानीमधून आत गेल्यावर सगळा चढ होता आणि वाटेवर दोन्ही बाजूंनी दगडी बांधकामे. त्यामुळे थांबत थांबत सगळा ग्रूप चढत होता. वाटेत एके ठिकाणी त्याने सर्वांना थांबायला सांगितले. थांबलो होतो तेथे शेजारी वाटेच्या पातळीखाली सलग तीन घुमट दिसत होते. आजुबाजूला सारे वैराण, घुमटाखालच्या भितीच्या बाहेर माती भरलेली. भिंती दिसत नव्हत्याच. गाईड म्हणाले, 'हे काय आहे? ही अंधारकोठडी आहे, इथे गुन्हेगारांना ठेवत असत. आत कुणाला टाकले की बाहेर पडायला चान्स नाही. गुन्ह्याची कबुली दिली तर ठीक, नाहीतर आत त्याचा सापळाच शिल्लक राहायचा!' थोडे थांबून गाईडने ग्रूपच्या प्रतिक्रिया पाहिल्या. सारे चिडीचूप घुमटांकडे पाहत होते. कुणी काही बोलेना. चेव आल्याप्रमाणे गाईडने पुन्हा सुरू केले. 'बादशहा मुसलमान असूनही रामाची भक्ती करणारा, एक हिंदू साधू प्रजेत होता. त्याची भजने ऐकायला लोक गर्दी करायचे. बादशहाने त्याला पकडून आणून इथे अंधारकोठडीत टाकले. तरी तो इथे भजने म्हणायचा. घुमटामधून बादशहाचे सैनिक विचारायचे, 'इथे कसं वाटतंय?', तर म्हणायचा, 'माझा राम मला सोडवेल' अशी चार वर्षे गेली तेव्हा त्याची सुटका झाली. असला कसला तुमचा राम?' एवढे बोलून गाईडने विजयी मुद्रेने सर्वांकडे पाहिले. तर सारे आपले कुणीतरी थोबाडीत मारल्यासारखे चेहरे करून माना खाली घालून उभे होते. तेव्हा कशा कोण जाणे, माझ्या मस्तकात झिणझिण्या आल्या. मी एकदा वडिलांकडे पाहिले, आणि आवाज अजिबात चढू न देता गाईडला म्हटले, 'अहो मिस्टर अमूकतमूक, आयुष्यामध्ये चढउतार हे येतच असतात. कधी चांगल्या तर कधी वाईट गोष्टी घडतच असतात. हा हिंदू साधू इथून निदान चार वर्षांत बाहेर आला. पण तो ज्याची भजने म्हणत होता त्या खुद्द रामाला चौदा वर्षे वनवासात काढावी लागली होती, माहीत आहे का? आणि तुमच्या येशूच्या हातात आणि पायात खिळे ठोकून त्याला क्रूसाला लटकावले होते आणि शिवाय त्याच्या डोक्यावर काटेरी मुकूट चढवला होता हे तर तुम्हाला माहीतच असेल! तेव्हा, उगीच रामाला नावे ठेवण्यात काही पॉइंट नाही. आपल्या कुणाच्याच हातात काही नसतं.' आता थप्पड खाल्ल्यासारखा गाईडचा चेहरा झाला होता! कुणीच काही बोलत नव्हतं, शेजारी उभे असलेल्या वडिलांनी काही न बोलता फक्त माझ्या पाठीवर हात ठेवला; त्यातून मला काय ते समजले. नंतरच्या प्रवासात गाईडची आवाजी एकदम कंट्रोलमध्ये आणि मी अशा थाटात की जणू काही झालेलेच नाही. इतक्या वर्षांनंतर आज मी जेव्हा या प्रसंगाबद्दल विचार करते तेव्हा मला असे वाटते की माझ्यातली पाठारे प्रभू 'जीन्स' आणि हिंदु कॉलनी संस्कृती माझ्या पाठीशी असली पाहिजेत. म्हणजे निष्कारण होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार केलाच पाहिजे आणि त्यासाठी अंगात कसला तरी संचार होतो!

श्रीरामाच्या विषयावरून दुसरी एक इंटरेस्टिंग गोष्ट आठवली. इथे नाशिकला भोसला मिलिटरी ट्रेनिंग स्कूल आहे; बहुतेकांना माहीत असेल. त्या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना रायफल शूटिंगदेखील शिकवले जाते. आणि त्याची प्रॅक्टिस इथेच चालते. इथले उत्साही प्रमुख मेजर पी. बी. कुलकर्णी यांनी एकदा विद्यार्थ्यांना आवारात सारीकडे फिरून, शूटिंग-नंतर पडलेली धातूची 'शेल्स' गोळा करायला सांगितले, तेव्हा आठ पोती शेल्स जमली. त्यातून विद्यार्थी-दशेतल्या रामाची अतिशय सुबक आणि देखणी मूर्ती घडवून आवारात सुंदर मंदिरे बांधले आहे. आपल्यापैकी कुणी नाशिकला आले तर भोसला मिलिटरीमधील 'कोदंडपाणी राम' ही मूर्ती पाहायला अवश्य वेळ काढा.

# पाठारे प्रभु महिला समाज

रविवार दिनांक ४ एप्रिल २०१० रोजी सायंकाळी ४ वा. चैत्रातील वासंतिक हळदीकुंकू समारंभ सुरेश विठ्ठल हॉल, ठाकुरद्वार येथे साजरा करण्यात आला. त्याचदिवशी त्रैवार्षिक निवडणूक होती. जेवढ्या जागा तेवढेच अर्ज आल्यामुळे निवडणूक न होता सभासद बिनविरोध निवडून आले.

अध्यक्षा सौ. वृंदा जयकर ह्यांनी उपस्थित भगिनींचे स्वागत केले. चिटणीस सौ. अक्षदा तळपदे ह्यांनी निवडून आलेल्या सभासदांची यादी जाहीर केली. उपस्थित भगिनींना हळदीकुंकू, चणे, बत्तासे, आंबाडाळ व पन्हे देण्यात आले. सर्व भगिनींना विश्वस्त सौ. उषा जयकर ह्यांच्यातर्फे गजरे देण्यात आले. देवीची आरास करण्यासाठी चिटणीस सौ. प्रतिभा विजयकर ह्यांनी त्यांच्यातर्फे फुले आणली होती.

त्याचदिवशी कलात्मक पाककृतीची स्पर्धा घेण्यात आली होती. त्याचे परीक्षण सौ. अनुपमा गोडबोले यांनी केले. त्यांचे स्वागत करून त्यांना मिठाई देण्यात आली.

विषय-चॉकलेटपासून कलात्मक ईस्टर एग घरून करून आणणे

प्र. क्र.- सौ. सुजाता रामनाथ कोठारे
द्वि.क्र.- श्रीमती हेमा रामचंद्र जयकर
तृ. क्र.- सौ. स्नेहा नंदकिशोर कोठारे

सौ. बिंबा नायक ह्यांनी स्वतः बनविलेले ईस्टर एगचे प्रदर्शन केले व त्याची माहिती उपस्थित भगिनींना दिली.

उपाध्यक्षा सौ. स्वाती जयकर ह्यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर सर्व भगिनींनी मिळून देवीची आरती केली आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

**नवीन कार्यकारी समिती**

अध्यक्षा-सौ. वृंदा जयकर,
उपाध्यक्षा- सौ. स्वाती जयकर,
कोषाध्यक्षा-सौ. साया नवलकर,
सं. चिटणीस-सौ. नीता सेंजित, सौ. अक्षदा तळपदे, सौ. नूतन कीर्तिकर,

इतर सभासद-श्रीमती सुबोध प्रधान, श्रीमती रेणुका धुरंधर, सौ. प्रतिभा विजयकर, सौ. मेघना राणे, सौ. उत्तरा कोठारे, सौ. प्रमिला तळपदे, सौ. माधुरी कीर्तिकर, सौ. स्निग्धा कोठारे, सौ. बिंबा नायक

✧✧✧✧✧

पाठारे प्रभु महिला समाजाचा शनिवार दिनांक २४ एप्रिल २०१० रोजी अधिक मासानिमित्त हळदीकुंकू समारंभ साजरा करण्यात आला. त्याचदिवशी फॅन्सीड्रेस स्पर्धा, फॅन्सी वर्क स्पर्धा, फॅब्रिक पेटींग स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व सामान्य ज्ञान स्पर्धा घेण्यात आल्या.

सर्व भगिनींना हळदीकुंकू, मूग, म्हेसूर, गजरे व कोल्ड्रिंक देण्यात आले. विश्वस्त सौ. ज्योत्स्ना धैर्यवान व उपाध्यक्ष सौ. स्वाती जयकर ह्यांच्यातर्फे मूग, विश्वस्त सौ. उषा जयकर ह्यांच्यातर्फे म्हेसूर; तसेच सौ. उत्तरा कोठारेकडून गजरे व सौ. प्रमिला तळपदेकडून कोल्ड्रिंक देण्यात आले.

उपाध्यक्ष सौ. स्वाती जयकर ह्यांनी उपस्थित भगिनींचे स्वागत केले. स्पर्धेचे परीक्षण सौ. लीला गोडबोले, सौ. संगीता बिवलकर व सौ. श्वेता देसाई गोगटे ह्यांनी केले. त्यांना मिठाई देऊन त्यांचे स्वागत केले गेले.

स्पर्धेचे निकाल पुढीलप्रमाणे-

१) फॅन्सी ड्रेस स्पर्धा मुलींसाठी (१५ वर्षांखालील)
प्र. क्र.-कु. प्रणाली राकेश राणे (परी)
द्वि. क्र.- कु. अनुष्का आशीष नवलकर (पृथ्वी)

२) फॅन्सी वर्क स्पर्धा- ह्या स्पर्धेत एकच स्पर्धक असल्यामुळे त्याला समाजातर्फे बक्षीस दिले जाईल. श्रीमती शिल्पा प्रकाश धुरंधर.

३) फॅब्रिक पेंटींग स्पर्धा
प्र. क्र.-श्रीमती सुरुपा राणे देवरुखकर
द्वि.क्र.-सौ. विद्या विजय त्रिलोकेकर

४) फॅन्सी ड्रेस स्पर्धा महिलांसाठी
प्र.क्र.- सौ. विंदा कीर्तिकर (भाजीवाली)

(पान ६, कॉलम ४वर)

## प्रभुतरुणास देणग्या

❀ श्री. विठोबा गजानन नायक यांजकडून त्यांच्या विवाह सुवर्णमहोत्सवानिमित्त रु. १००१/-

❀ सौ. छाया व श्री. दीपक आनंदराव तळपदेकडून नात झाल्याबद्दल रु. २५१/-

## प्रतिक्रिया

श्री. प्रताप वेलकर यांसी,

आपण लिहिलेल्या 'दर्पण' बद्दलचा लेख ज्ञातीतील दोन्ही मासिकांनी आपापल्या फेब्रुवारीच्या अंकात प्रसिद्ध केला. त्याबद्दल ह्या दोन्ही मासिकांचे मी आभार मानतो. मला फक्त विमानाची पहिली चाचणी करणारे शिवकर बापूजी व पहिले संगीत नाटककार त्रिलोकेकर हे 'जातवाले' ठाऊक होते. त्यात ही भर झाली.

वास्तविक हाच लेख पत्ररूपी का होईना; मराठी दैनिकातून छापून आला असता तर ह्या मुद्याचे 'जागतिकीकरण' झाले असते, जे आजकालच्या काळात जरुरी आहे. तसे इतिहासाची मोडतोड करणे हा एक राजकारणी खेळच झाला आहे. उदा. दोनदा साजरी होणारी शिवजयंती, वगैरे.

आद्य ज्ञातीबांधवांना योग्य प्रसिद्धी मिळावी म्हणून आपण उचललेल्या विड्याची फलश्रुती म्हणून 'भाऊचा धक्का' जवळील चौकास व आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या रस्त्यावरील प्रमुख चौकास ज्ञातीबांधवांची नावे दिली गेली. त्याबद्दल कदाचित मोजक्याच ज्ञातीबांधवांनी आपले अभिनंदन केले असेल. पण पुढे काय?

दुर्भाग्याची गोष्ट अशी आहे की ही चौकांची नावे कदाचित अजरामर होतील. पण हे काम घड्वून आणणाराचे कोणी नावदेखील घेत नाही. जसा पत्रिकेचा संपादक नावाजला जातो व आद्य संस्थापक कोनाड्यात पडून राहतो. मग तो बिर्ला, गोयेंका घराण्यातला असो वा जातीबांधव.

आपण लिहीलेल्या ज्ञातीच्या इतिहासाच्या ग्रंथाची विक्री ज्ञातीतील आनंद मेळाव्यात करावी; म्हणजे नव्या पिढीला ज्ञातीबद्दल अभिमान वाटेल त्यातील मजकूर वाचून.

**-उदय बा. जयकर**

## अभिनंदन

आमचे विश्वस्त श्री. गुंजारव विहंग नायक यांची 'झी' टी.व्ही.वर उपाध्यक्ष म्हणून पदोन्नती झाली. हार्दिक अभिनंदन.

## परीक्षेतील सुयश

❀ अनुष्का आशीष नवलकर ही बृहन्मुंबई निम्नस्तर मराठी शिक्षक संघटना आयोजित प्रथमेश मराठी भाषा (दुसरी परीक्षा) विशेष प्राविण्य श्रेणीत डिसेंबरमध्ये उत्तीर्ण झाली. त्याचप्रमाणे

❀ भारतीय (भरतनाट्यम्) परीक्षा प्रवेशिका पूर्ण ६८ टक्के गुण मिळवून द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण.

## आभार

संपादिका प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभुप्रभात, महिला समाज, चॅरिटीझ या संस्थातर्फे शुभेच्छा व्यक्त झाल्या. आभारी आहे.

## वृत्त

मनसे आयोजित अंधेरी स्पोटर्स कॉप्लेक्स येथे दिनांक २४ एप्रिल ते ३० एप्रिल २०१० रोजी खाद्यजत्रेत श्री. व सौ. अनघा केदार गोरक्षकर यांचा एकमेव पाठारे प्रभू व इतर पदार्थांचा स्टॉल ठेवण्यात आला.

(पान ५, कॉलम ४ वरून)

द्वि.क्र.- सौ. स्वप्ना विनित जयकर (सोंगाड्या)

५) वक्तृत्व स्पर्धा-मुलींसाठी

प्र.क्र.-कु. भाग्यश्री सागर अजिक्य (इंग्लीश)

द्वि.क्र.- कु. अनुष्का आशीष नवलकर (मराठी)

महिलांसाठी (मराठी)

प्र. क्र.- सौ. स्वप्ना विनित जयकर

द्वि.क्र.- सौ. वैदेही राकेश राणे

तृ.क्र.- श्रीमती सुरुपा राणे देवरुखकर

महिलांसाठी (हिंदी)

प्र.क्र.-सौ. स्वप्ना विनित जयकर

द्वि.क्र.-सौ. विंदा कीर्तिकर

तृ.क्र.- श्रीमती सुरुपा राणे देवरुखकर

सामान्य ज्ञान स्पर्धा- मुलींसाठी (वय गट १० ते १५ वर्षे)

प्र. क्र.-कु. भाग्यश्री सागर अजिक्य

द्वि.क्र.- कु. अनुष्का आशीष नवलकर

चिटणीस सौ. अक्षदा तळपदे ह्यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर कार्यक्रम संपन्न झाला. ❑

**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८० ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### बाळा जो जो रे

१-४-१० सौ. तृप्ती व श्री. अनुरेश दीपक तळपदे, कन्या, मालाड

१६-४-१० सौ. सुनीती व श्री. अमित हर्षवर्धन आगासकर, पुत्र, वांद्रे

६-५-१० सौ. अदिती आणि डॉ. अनिकेत तळपदे, पुत्र, बोरीवली

### विवाह सुवर्णमहोत्सव

८-५-१० श्री. विठोबा गजानन नायक, सौ. मेघा (पूर्वाश्रमीची रोशना यशवंत कोठारे)

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ३-४-१० | श्रीमती उषा दत्तात्रय धुरंधर, | वय ७२, | अमेरिका |
| २७-४-१० | श्री. किशोर शामराव तळपदे, | वय ७२, | सांताक्रूझ |

### चुकीची दुरुस्ती

गतांकी 'मरण' या सदरात शुभाऐवजी शोभा (शरयू) प्रभाकर जयकर असे वाचावे

## विवाह सुवर्ण ज्युबिली

### ८ मे

### (१९६०-२०१०)

ह्या शुभदिना प्रसंगी पतिराजांकडचा जीवनातल्या सहचारिणीला सप्रेम आहेर

गोल्डन ज्युबिली लग्नाची करतो
साजरी।
लाडके तू आजही दिसतेस सुंदरी ।।
आठ मे साठीचा दिन याद मज करी।
सुंदर ते रूप तुझे होती लाजरी।।
आठवणी हनीमूनच्या गुदगुल्या करी।
अर्ध शतक खूप सुख भोगले तरी।
वर्षावरी वर्षे अशी घेऊया पदरी।।१।।
मित्रमैत्रिणी, पडोशी जमले बघ घरी।
सगे सोयरेही सारे खूष किती तरी।
अभिनंदन, अभिनंदन गर्जना करी।
लाडके ही सारी पुण्याई तुझी खरी।
जन्मो जन्मी सहचारिणी तूच मज
बरी।।२।।
बरका लाडके,

**-विठोबा ग. नायक**

## विवाह सुवर्ण ज्युबिली

### ८ मे

### (१९६०-२०१०)

ह्या शुभदिना प्रसंगी लाडक्या पत्नीचा आपल्या पतीराजांचा गुणगौरव

देव जरी मज कधी भेटला।
माग हवे ते माग म्हणाला।
म्हणेन प्रभू दे जन्मो जन्मो।
हाच पती सुख अनुभवण्याला ।।
भाग्यवती मी समजते मजला।
विठूराया मज पती लाभला।।
धैर्याने सामोरी गेला।
घोर घटना निवारण्याला ।।१।।
कधी ना कोठे हात पसरला।
ना चुकला तो कर्तव्याला।
अभिमानाने सांगते सकळा।
माझा पती सर्वांत वेगळा ।।२।।
हास्य मुखी तो सदा राहिला।
मला नेहमी धीर द्यायला।
उदंड आयु लाभो त्याला।
हीच प्रार्थना माझी देवाला ।।३।।
देव जरी मज कधी भेटला....

**-सौ. मेघा विठोबा नायक**


*JOGESHWARI RESORT*

**SANITORIUM**

Under ISHWARI & VIDYADHAR CHARITABLE TRUST No. 14, Divya Hilltop Cottages, Nangargaon, LONAVALA.

Fully furnished Double Bedroom Hall & Kitchen Units Equipped with Gas, Stove, Utensils and Refrigerators available on daily charge basis.

Special concessions available on request for Womens' and Children's Institutions, Aged, Disabled or for other justifiable reasons and medical certificates. Booking made on phone as below. Also available, at the Mumbai address, Wheel Chair, Walkers, Crutches, against refundable deposits only.

Trustees: PRAMILA & MADHUKAR TALPADE
102, ``PRIYA'' Raviraj Oberoi Complex, SAB T. V. Lane,
New Link Road, Andheri(W), Mumbai-400 053.
Tel.: 2630 3902/2630 3906 Mobile: 9821447675
Booking Mobile: 09823884094/09422543614



// श्री इंद्रायणीप्रसन्न // // श्री गुरुदेव दत्त //

**प्रकाश कॅटरर्स**

शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!

आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम खाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा! विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो. खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.

संपर्क :
**प्रवीण धुरंधर**
डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.
फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८